## निशाणी १ खालील आदेश

(घोषीत दिनांक २०/०३/ २०२६)

१. अर्जदाराने सदर अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथनानुसार, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे- धर्मा राघो वानखेडे रा. बेलगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा, हे दि. ३०/१२/२०२३ रोजी बेलगाव ता. मेहकर, जि. बुलढाणा येथे मयत झालेले आहेत. अर्जदार यांचे आजी व आजोबा हे सुध्दा मयत झालेले आहेत. मयत धर्मा राघो वानखेडे यांना त्यांचे पश्चात अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून याव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. त्याप्रमाणे दैनिक सामना या वर्तमानपत्रात दिनांक १६/१०/२०२५ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहीर नोटीस निशाणी २२ वर दाखल आहे. सदर प्रकरणात जाहीरनामा प्रसिद्ध केलेबाबतचा अहवाल निशाणी ०८ वर दाखल असून निशाणी १६ वर धर्मा राघो वानखेडे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल आहे. निशाणी क्रमांक १७ ते २० वर अर्जदारांचे ओळख पत्राची पडताळणी केलेल्या प्रत दाखल केली आहे. तसेच नि. क्र. २१ वर सरपंच ग्रा. पं. बेलगाव यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्र.

४. अर्जदार क्र. ४ सुधिर धर्मा वानखेडे यांनी निशाणी १५ वर पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडिल धर्मा राघो वानखेडे हे दि. ३०/१२/२०२३ रोजी बेलगाव ता. मेहकर, जि. बुलढाणा येथे मयत झालेले आहेत. त्यामुळे मयत धर्मा राघो वानखेडे यांना त्यांचे पश्चात अर्जदार क्र. १ ते ४ हा वारस असून याव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता, अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जदाराच्या पुराव्यास आजपावेतो कोणीही आवाहन दिले नाही अथवा आक्षेप घेण्यासाठी हजर झाले नाही. त्यामुळे सदर पुरावा जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धीपासून अविचल व अबाधीत राहिला.

५. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे वारसदार हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी, त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्याचे आत अर्जदारांचे हक्काबाबत आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. तसेच नियम ७ चा दुसरा भाग असे विहित करतो, की सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसून ते फक्त व्यक्तीचे वारसासाठी सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमतः हक्क निर्णित करीत नाहीत किंवा इतरांचे हक्कास हानी पोहचवत नाही.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार वारस प्रमाणपत्र मागत आहेत. याकामी इतर कोणीही हजर राहून आक्षेप अथवा हरकत नोंदविली नाही. दिनांक १६/१०/२०२५ रोजीपासून आजपावेतो प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा पुरावा अभेद्य राहिला आहे. त्यामुळे अर्जदार हे मयत धर्मा राघो वानखेडे यांचे मान्यताप्राप्त वारस असल्याचे दिसून येते. करिता, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे तरतुदीनुसार अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत धर्मा राघो वानखेडे यांचे कायदेशीर वारस आहेत.

३. अर्ज निकाली काढण्यात येतो.

स्वा/-
(प्रतिभा मा. कांबळे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कोर्ट नं. २,मेहकर

दिनांक २०.०३.२०२६